महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १७७ वा | दिनांक : १७/०४/२०२५ | वार : गुरूवार

# कुणाल कामराला अटक करता येणार नाही : मुंबई हायकोर्ट



**मुंबई** : स्टँड-अप कॉमेडियन कुणाल कामराने आपल्यावर दाखल केलेला एफआयआर रद्द करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज दोन्ही पक्षांची सुनावणी पूर्ण झाली आहे. कुणाल कामराचा जबाब नोंदवण्यासाठी त्याल अटक करण्याची गरज नाही. तुम्ही त्याचा जबाब तामिळनाडूत जाऊनही नोंदवू शकता, अशा शब्दांत मुंबई हायकोर्टाने पोलिसांना फटकारले. तसेच तीन तासांहून अधिक काळ सुनावणी केल्यानंतर, न्यायालयाने एफआयआर रद्द करण्याबाबतचा निर्णय राखून ठेवला. तसेच यावर निर्णय होईपर्यंत कुणाल कामराला अटक करता येणार नसल्याचे हायकोर्टाने म्हटले आहे.

कुणाल कामराने २३ मार्च रोजी त्याच्या शोमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल विडंबनात्मक गीत सादर केले होते. याप्रकरणी मुंबई पोलिसांनी कुणाल कामराविरोधात तक्रार दाखल केली होती. आता ही तक्रार रद्द करण्याच्या मागणीसाठी कुणाल कामराने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर आज सुनावणी पार पडली. न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती एस एम मोडक यांच्या द्विसदस्य खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली. या सुनावणीवेळी न्यायाधीशांनी पोलिसांना फटकारले.

आजच्या सुनावणी दरम्यान अ‍ॅड. नवरोज सीरवी यांनी कुणाल कामराची बाजू मांडली. तर पोलिसांच्या वतीने सरकारी वकील अ‍ॅड. हितेन वेणूगावकर यांनी युक्तीवाद केला. कुणाल कामरा यांच्या याचिकेत तथ्य नसल्याचे सांगत ती याचिका रद्द करावी, अशी मागणी सरकारी वकील हितेन वेणूगावकर यांनी युक्तीवादादरम्यान केली. पण यावेळी कोर्टाने काही सवाल उपस्थित केले.

कुणाल कामराने उपमुख्यमंत्र्यांच्या वैयक्तिक जीवनावर टिप्पणी केलेली नाही. त्याने त्यांच्या सरकारी धोरणांवर किंवा निर्णयांवर कोणतीही टीका केलेली नाही. कुणाल कामराचे स्टेटमेंट घेण्याची गरज आहे का? कामरा यांच्या जिवाला धोका असताना आपण चौकशीला त्यांना स्वत: उपस्थित राहण्याबाबत का सांगत आहात ? त्यांच्या जिवाला धोका आहे तर मग आपण त्यांच्या सुरक्षेची काळजी घेणार का? असा सवाल कोर्टाने उपस्थित केला. तुमचे काही लोक तिथे जाऊनही जबाब नोंदवू शकता. आम्ही जर तुम्हाला तिथे जाऊन जबाब नोंदवण्याची परवागी देत आहोत मग काय हरकत आहे? असेही कोर्टाने म्हटले.

# औरंगजेबाच्या कबरीचा वाद संयुक्त राष्ट्रसंघात पोहोचला



**मुंबई** : खुलताबाद येथील औरंगजेबाच्या कबरीचा वाद आता संयुक्त राष्ट्र संघात पोहोचला आहे. शेवटचा मुघल बादशहा बहादूर शाह जफर यांचे वंशज असल्याचा दावा करणारे याकूब हबीबुद्दीन तुसी यांनी संयुक्त राष्ट्र सरचिटणीस अँटोनिया गुटेरस यांना एक पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी औरंगजेबाच्या समाधीची सुरक्षा सुनिश्चित करण्याची मागणी केली आहे.

मागील काही दिवसांपासून औरंगजेबाच्या कबरीवरून वाद सुरू आहे. छत्रपती संभाजी महाराजांना हाल हाल करून मारणाऱ्याची कबर उघडून टाकावी, अशी मागणी काही हिंदुत्ववादी संघटनांनी केली होती. त्यासाठी रस्त्यावर आंदोलने देखील झाली. या कारणावरून नागपूरमध्ये दंगलही उसळली होती. या घटनेच्या एक महिन्यानंतर आता शेवटचा मुघल बादशहा बहादूर शाह जफर यांचा वंशज असल्याचा दावा करणाऱ्या याकूब हबीबुद्दीन तुसी यांनी या कबरीला कायदेशीर संरक्षण मिळावे अशी मागणी संयुक्त राष्ट्रसंघाकडे केली आहे.

ही कबर 'राष्ट्रीय महत्त्वाचे स्मारक' म्हणून घोषित करण्यात आले आहे आणि प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळे आणि अवशेष कायदा, १९५८ अंतर्गत संरक्षित आहे. या कायद्यातील तरतुदींनुसार संरक्षित स्मारकाजवळ किंवा जवळ कोणतेही अनधिकृत बांधकाम, फेरफार, तोडफोड किंवा उत्खनन करता येणार नाही. अशी कोणतीही कृती कायद्यानुसार बेकायदेशीर आणि दंडनीय मानली जाईल, असे तुसी यांनी पत्रात म्हटले.

याकूब तुसी यांनी आपल्या पत्रात संयुक्त राष्ट्रांच्या महासचिवांना या प्रकरणाची दखल घेण्याचे आवाहन केले आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांनुसार औरंगजेबाच्या कबरीला संपूर्ण कायदेशीर संरक्षण, सुरक्षा आणि संरक्षण देण्यासाठी भारत सरकार आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (एएसआय) यांना निर्देश द्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली. यासोबतच भारताने जागतिक सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसा संरक्षणावरील युनेस्कोच्या करारावर स्वाक्षरी केली आहे, १९७२ आणि अशा स्मारकांचा नाश किंवा दुर्लक्ष हे आंतरराष्ट्रीय दायित्वांचे उल्लंघन असेल, असेही त्यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

# उर्दूचा जन्मच मुळात भारतातील, तिला धर्माशी जोडता येत नाही : सुप्रीम कोर्ट

**नवी दिल्ली** : अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपरिषदेच्या नामफलकावरील उर्दूचा उल्लेख योग्यच असल्याचा महत्त्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी एका प्रकरणात सुनावणी करताना दिला. मराठी व हिंदीसारखी उर्दू ही एक इंडो-आर्यन भाषा आहे. तिचा जन्मच मुळी भारतीय भूमीत झाला. त्यामुळे तिला कोणत्याही धर्माशी जोडता येत नाही. उर्दू ही भारतासाठी परकीय भाषा आहे हा एक पूर्वग्रह आहे, असे कोर्टाने या प्रकरणी ठणकावून सांगितले आहे.

पातूर नगरपरिषदेचा नामफलक उर्दू भाषेत आहे. या बोर्डावर माजी नगरसेविका वर्षाताई बगाडे यांनी आक्षेप घेतला होता. महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण (अधिकृत भाषा) कायदा २०२२ अंतर्गत उर्दूचा वापर करण्यास परवानगी नाही, असा दावा त्यांनी केला होता. या प्रकरणी त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. पण तिथे त्यांना कोणताही दिलासा मिळाला नाही. अखेर त्यांनी सुप्रीम कोर्टाचे दार ठोठावले. पण तिथेही त्यांची निराशा झाली.

पातूर नगरपरिषदेचा नामफलक १९५६ पासून आहे. येथील स्थानिकांना उर्दू भाषा मोठ्या प्रमाणात समजते. त्यामुळे हा नामफलक काढून टाकण्याची काहीच गरज नाही. मराठी व्यतिरिक्त उर्दू वापरण्यास कोणताही कायदेशीर प्रतिबंध नाही. २०२२ च्या कायद्यानुसार किंवा कायद्याच्या कोणत्याही तरतुदीनुसार उर्दू वापरण्यास बंदी नाही. भारतीय संविधानाच्या ८ व्या अनुसूचीमध्ये याचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यामुळे ही याचिकाच मुळात भाषा व कायद्याच्या चुकीच्या समजुतीवर आधारित आहे, असे सुप्रीम कोर्टाच्या न्यायमूर्ती सुधांशू धुलिया व न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने या प्रकरणी स्पष्ट केले.

खंडपीठ पुढे म्हणाले, मराठी व हिंदीसारखीच उर्दू ही एक इंडो - आर्यन भाषा आहे. उर्दूचा विकास व भरभराट झाली. कारण वेगवेगळ्या सांस्कृतिक वातावरणातील याच भाषेतून विचारांची देवाणघेवाण होत होती. लोक एकमेकांशी संवाद साधायचे. शतानुशतके त्यात सुधारणा होत गेली. अनेक प्रशंसित कवींची ही भाषा पसंतीची बनली. फौजदारी व दिवाणी कायद्यातही उर्दू शब्दांचा फार मोठा प्रभाव आहे. अदालतपासून हलफनामा ते पेशी अशा विविध भारतीय न्यायालयांच्या भाषेत उर्दूचा मोठा प्रभाव आढळतो.

उर्दू मूळ भारतीय भाषा असूनही ती वसाहतवादी शक्तींमुळे मुस्लिम धर्माशी जोडली गेली. वास्तविक उर्दू भाषेचा जन्म कुठे झाला व तिच्या अस्तावर सविस्तर चर्चा करण्याचा हा प्रसंग नाही. पण एवढे म्हणता येईल की, हिंदी व उर्दू या दोन भाषांच्या मिश्रणातून हिंदी अधिकाधिक संस्कृतीकृत झाली, तर उर्दू भाषा अधिक पर्शियन झाली. उर्दूचे मूळ हे भारतात आढळले. त्यामुळे तिला कोणत्याही विशिष्ठ धर्माशी जोडता येत नाही.

भाषा ही विचारांच्या आदानप्रदानाचे एक माध्यम आहे. तिच्या माध्यमातून विविध विचार व श्रद्धा असणारे लोक जोडले जातात. त्यामुळे ती त्यांच्या विभाजनाचे कारण बनता कामा नये असे नमूद करत कोर्टाने वर्षाताई बागडे यांची याचिका धुडकावून लावली. पातूर नगरपरिषदेच्या हद्दीत राहणारे लोक किंवा लोकांचा समूह उर्दू भाषेशी परिचित असेल तर नगर परिषदेच्या फलकावर मराठीशिवाय उर्दू वापरल्यास त्यावर कोणताही आक्षेप असता कामा नये. नगरपरिषदेचा उर्दू भाषेतील नामफलक हा राजकारण किंवा धर्माशी संबंधित नाही तर सार्वजनिक संवादाचा विषय आहे, असेही कोर्टाने या प्रकरणी स्पष्ट केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १७ एप्रिल २०२५

## जेईएस महाविद्यालयात मुलींच्या वस्तीगृहात सॅनिटरीपॅड वेंडिंग मशीनचे उद्घाटन




**जालना (प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जेईएस महाविद्यालय जालना येथे मुलींच्या वस्तीगृहमध्ये इनव्हीलर क्लब ऑफ जालना सेंट्रल तर्फे मुलींसाठी सॅनिटरी पॅड करिता वेंडिंग मशीन लावण्यात आले असून त्याचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इनव्हीलर क्लब ऑफ जालना सेंट्रलचे अध्यक्ष प्रा .शिल्पा कावोना, सचिव श्रीमती अग्रवाल, उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, पर्यवेक्षक डॉ. सुमन बिक्कड, पर्यवेक्षिका प्रा. करूणा वासनिक, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे, वस्तीगृहप्रमुख श्रीमती तळेकर, ग्रंथपाल डॉ.मनीषा सुतार प्रा. उषा चौधरी, प्रा. धनश्री देशपांडे, प्रा. मोनिका काळे, सेविका मिराबाई व वंदना लखापती तसेच वस्तीगृहातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे, लाडक्या बहिणींना २१०० रुपये अनुदान देण्याची उबाठा शिवसेनेची मागणी




**अतनुर (प्रा.सुधीर पंचगल्ले)** तालुक्यात भाजप प्रणित सरकारने सत्तेत बसण्यासाठी वचनामा जाहीर केला होता. त्या जाहीरनामाची सरसकट अंमलबजावणी करण्यासाठी शिवसेना जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करण्याचे आश्वासन दिले होते. व लाडक्या बहिणींना २१०० रुपये अनुदान देण्याची जाहीर केले होते. शेतातील व घरगुती वीज बिल माफ करावे, शेतकऱ्यांनी बँकेचे घेतलेले कर्ज माफ करण्याऐवजी बँकेने कर्जधारक शेतकऱ्यांना त्रास देण्याची काम चालू आहे. आज शेतकऱ्यांच्या शेतमालाला कुठल्याही प्रकारचा हमीभाव दिला जात नाही. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. तरी सरसकट शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे, त्याबद्दल कर्ज वसुली सक्तीची करण्यात येत असून ती करण्यात येऊ नयेत. सततच्या कर्ज वसुलीमुळे शेतकऱ्यांना मागे आड, तिकडे विहीर अशी अवस्था झाली आहे. त्यामुळे शेतकरी कर्जापोटी आत्महत्या चा मार्ग अवलंबित असून शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची वेळ येऊ नये म्हणून तात्काळ कर्ज वसुली थांबण्यात यावी व कर्जमाफी देण्यात यावी. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्यात यावे. शेतीतील व घरगुती वीज बिल माफ करण्यात यावे. घरकुल यांच्या लाभार्थ्यांना वाळू मोफत वाटप करण्यात यावी. घरकुलाच्या अनुदान त्वरित देण्यात यावे, अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तहसील कार्यालयात शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांच्या उपस्थित जळकोट तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनानुसार मागणी मान्य नाही झाल्या तर तहसील कार्यालय जळकोट समोर समोर शिवसेना स्टाईल आंदोलन करण्यात येईल असे निवेदन शिवसेना उपजिल्हाप्रमुख कैलास पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख विकास गोविंदराव सोमुसे-पाटील अतनूरकर, शंकर धोंडापुरे, महिला आघाडी तालुकाप्रमुख सत्यभामा कदम, शहर प्रमुख नितीन धूळशेटे, सोपा शंकर सावकार, सारंग आगलावे, प्रियंका बोळेगावे, विकास कापसे, सुभाष गुंडिले, नितीन भाऊ शेट्टी, शंकर सोपा, विश्वनाथ महाराज, बाळू पाटील, लड्डू संगेवार, हिंगणे गुरुनाथ, राम जडीतकर, बाबू कदम, माधव सोमसे, कापडे, गोविंद बारसुळे, कापसे नवनाथ, गोळेगाव शंकर, भोळे गाव कदम, सत्यभामा कदम, भीमराव ढवळे, शंकर धोंडापुरे, संगेवार प्रमोद, सारंग आगलावे, वेंकट शिनगारे, नारायण कळसे, बसवराज नाईकवाडे, सुरेंद्र साळुंखे, शिवचंद्र थोटे, सदानंद पांचा ळ, शिवशेट्टी बालाजी, गजानन बादुर्ग, अशोक पांचाळ, संभाजी थोटे, ज्ञानोबा रावन गुप्ते यांच्या निवेदनावर सह्या आहेत.




## रक्तदान हे सर्वोत्तम दान, गरजवंताचे प्राण आपण वाचवू शकतो - गटशिक्षणाधिकारी आराख



**गंगापुर (सचिन वालतुरे पाटील) :** रक्तदान हे सर्वोत्तम दान असून आपल्या रक्तदानामुळे एखाद्या गरजवंताचे प्राण आपण वाचवू शकतो ही संवेदनशील भावना मनात बाळगून असणाऱ्या समस्त शिक्षक बंधू व भगिनींनी जास्तीत जास्त रक्तदान स्वतः करून समाजातील इतर घटकांनाही रक्तदानासाठी प्रेरित करावे व समाजोपयोगी कार्यास हातभार लावावा.ही बाब भूषणावह आहे असे प्रतिपादन गंगापूरचे गटशिक्षणाधिकारी समाधान आराख यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघातर्फे महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी सोमवार 14 रोजी बोलत होते. यावेळी विचारमंचावर शिक्षक नेते मधुकर वालतुरे, गंगापूर पंचायत समितीचे लेखाधिकारी सुनील खंडाळे, शिक्षण विस्ताराधिकारी अनिलकुमार सकदेव,करण मोहिते,दत्ताजी भाले रक्तपेढीचे संपर्क अधिकारी प्रशांत चिटणीस, राजेंद्र सरोवर, जयेश निरपळ,अशोक पाटील,शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष राजेश हिवाळे,चेअरमन संजय भडके,लक्ष्मण उबाळे,सुनील साळवे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना शिक्षक नेते मधुकर वालतुरे म्हणाले की,रक्तदान हे सर्वोच्च दान असून आपल्या रक्तदानामुळे एखाद्या गरजूचे प्राण वाचू शकतात ही भावना लक्षात घेऊन शिक्षक संघ व धर्मनिरपेक्ष बुद्धिवादी विचारांच्या महान कार्याचे बीजारोपण ही भावना समाजाच्या मनामनात रुजावी या हेतूने महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ गंगापूर तालुक्याच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन कौतुकास पात्र आहे. प्रास्ताविक तालुकाध्यक्ष कल्याण राऊत, सूत्रसंचालन सचिन वालतुरे यांनी केले तर आभार मोसीम सय्यद यांनी मानले. यशस्वीतेसाठी सतीश कबाडे, प्रदीप जाधव,संदीप काळे,विनोद डिके, सखाराम ठाणगे, दत्ता शेळके, रितेश निंभोरकर, शैलेश लाड, सागर घोणशेट्टे, प्रभाकर बाविस्कर,प्रवीण कोल्हे, ज्ञानेश्वर आंधळे यांनी पुढाकार घेतला. यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या शिलेदारांसह शिक्षण प्रेमी,रक्तदात्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १७ एप्रिल २०२५


## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने मोफत नेत्र तपासणी व दंत चिकित्सा शिबिर




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भीमनगर, मुरूम, ता. उमरगा येथील सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात रोटरी क्लब मुरूम सिटी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व दंत चिकित्सा शिबिर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून बुधवारी (ता. १६) रोजी घेण्यात आले. धाराशिव येथील जे. एफ. अजमेरा रोटरी नेत्र रुग्णालयाचे नेत्र तज्ञ डॉ. शिवरुद्र इसाके, डॉ. सागर शिंदे, उमरगा येथील उपजिल्हा रुग्णालयाचे दंत चिकित्सक डॉ. शिवाजी मेनकुदळे, शल्यचिकित्सक डॉ. प्रभाकर बिचकाटे, कान नाक घसा तज्ञ डॉ. विजय जाधव, अक्षय भालेराव आदींनी रुग्णांची योग्यती तपासणी करून औषधोपचार केला. यावेळी रोटरीचे अध्यक्ष कमलाकर मोटे, सचिव सुनिल राठोड, डॉ. नितीन डागा, प्रा. डॉ. महेश मोटे, डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, डॉ. महेश स्वामी, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक एम. एन. अर्दाले, वैद्यकीय अधिकारी डॉ. जी. एल. कांबळे, रवि भालेराव, संतोष थोरात, सुजित जाधव, विजयकुमार भोसले, रवि लोहार आदींची प्रमुख उपस्थिती होती. जयंती समितीचे संयोजक तथा अध्यक्ष प्रा. महेश कांबळे, उपाध्यक्ष आशिष नाईकवाडे, कोषाध्यक्ष संतोष कांबळे, सचिव प्रशांत गायकवाड, सहसचिव गौतम गायकवाड आदींनी पुढाकार घेतला. जयंती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल नागरिकांमधून कौतुक होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या सामाजिक समतेचा संदेश कृतीत उतरण्याचा हा प्रयत्न असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. या शिबिरात २०० पेक्षा अधिक रुग्णांमध्ये जेष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांची काळजीपूर्वक तपासणी करण्यात आली. काही गरजू रुग्णांना पुढील उपचारासाठी विनामूल्य चष्मे आणि शस्त्रक्रियेची शिफारस करण्यात आली.

## ग्रामीणतेचा न्यूनगंड सोडून तरुणांनी आव्हाने पेलावीत: मा. तुकाराम जाधव



**उमरगा :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आपण ग्रामीण भागातून आलोत, आपली भाषा, संभाषण कौशल्य अशा अनेक गोष्टींच्या बाबतीत विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड असतो. त्यामुळे आपण शहरी भागातील विद्यार्थ्यांची बरोबरी करू शकणार नाही या गैरसमजातून विद्यार्थी आपल्यासमोरील आव्हाने पेलण्यात असमर्थ ठरतात. ग्रामीण भाग किंवा आपली भाषा हा आपल्या प्रगतीच्या मार्गातील अडथळा नसून आपल्या गुणवत्तेच्या बळावर भविष्यातील आव्हाने पेलण्याची क्षमता स्वतःमध्ये निर्माण करावी असे आवाहन द युनिक अकॅडमी, पुणे चे संचालक मा. तुकाराम जाधव यांनी केले. ते काल श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात मार्च एप्रिल २०२४ मध्ये पदवी आणि पदव्युत्तर पदवी प्राप्त विद्यार्थ्यांच्या दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. अमोल मोरे अध्यक्षस्थानी होते. यावेळी मा. पद्माकराव हरळकर, डॉ. सुभाष वाघमोडे, मा.रामराव इंगोले, मा.दिगंबरराव बिराजदार, मा. अशोकराव पाटील आणि प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांची प्रमुख उपस्थिती होती. येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या निर्देशानुसार मार्च एप्रिल २०२४ मध्ये उत्तीर्ण पदवी आणि पदव्युत्तर वर्गातील पदवी प्राप्त विद्यार्थ्यांसाठी दीक्षांत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मा. तुकाराम जाधव यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत असलेल्या करिअरच्या संधी विषयी माहिती दिली. अनेक आयएएस, आयपीएस, प्रशासकीय अधिकारी हे मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये शिकून देखील आपले करिअर घडू शकले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्यामध्ये न्यूनगंड न ठेवता ध्येय निश्चिती करावी, असा सल्ला त्यांनी यावेळी पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना दिला. याप्रसंगी भारत शिक्षण संस्थेच्या वतीने सहसचिव डॉ. सुभाष वाघमोडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ही संस्था ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या हितासाठी नेहमीच कटिबद्ध राहील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. दीक्षांत समारंभाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी केले. यावेळी त्यांनी दीक्षांत समारंभाचे आयोजना मागची भूमिका विद्यार्थ्यांसमोर व्यक्त केली.याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले, डॉ. वसंत हिसल, डॉ. डी. बी. ढोबळे, डॉ. व्हि. एस. सूर्यवंशी, डॉ. अशोक पदमपल्ले, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिग्रस येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त घडले राष्ट्रीय ऐक्याचे अभिनव दर्शन !



**दिग्रस (महेश मुंढे)** दिग्रस येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त तालुका पत्रकार संघाच्या पदाधिकारी व इतर मान्यवरांतर्फे बौद्ध बांधवांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.यामुळे डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या राष्ट्रीय ऐक्याचे अभिनव दर्शन घडले. याबाबत सविस्तर असे की सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आरोग्य-विषयक तसेच इतर जनहिताच्या उपक्रमासह जातीय सलोखा अबाधित राखण्यासाठी सदैव तत्पर असलेल्या दिग्रस तालुका पत्रकार संघातर्फे नेहमीच विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. दिग्रस तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष पी पी पप्पूवाले, यशवंत सुर्वे-पाटील, दिग्रस पंचायत समितीचे माजी सभापती रामकृष्ण इंगोले,गोपाल शाह, फारूक अहेमद,मजहर अहेमद खान, अब्दुल रफीक शेख , आमीन चौहान,आसिफ काजी , फारूक चौहान ,सादिक गारवे आदींनी स्थानिक कच्छी चौकात डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त गुलाबपुष्प देऊन बौद्ध बांधवांचे स्वागत केले. दिग्रस येथील समता पर्व-२०२५ चे अध्यक्ष केटी जाधव,निवृत्त शिक्षणाधिकारी डॉ वाल्मिक इंगोले,निवृत्त तहसीलदार रवी तुपसुंदरे, संकल्प महासभेचे गौतम तुपसुंदरे,भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे किशोर कदम,श्रीराम तायडे,संजय मुजमुले, श्याम काजळेसह बौद्ध समाजातील असंख्य बांधवांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. दिग्रस तालुका पत्रकार संघाच्या सदर उपक्रमामुळे राष्ट्रीय ऐक्याचे अभिनव तसेच कृतीपूर्ण दर्शन घडले.श्रीराम नवमी,शिवजयंती, हनुमान जयंती व इतर अनेक कार्यक्रमात पत्रकार संघाचे पदाधिकारी तसेच मुस्लीम समाजातील सुज्ञ मंडळीतर्फे दरवर्षी खिचडी, शरबत , पाणी वाटप करण्यात येते किंवा स्वागत करण्यात येते. त्यांच्यामुळे हिंदू-मुस्लीम तसेच राष्ट्रीय ऐक्य वाढण्यास मदत होते.सदर उपक्रमाची सर्वत्र प्रशंसा केली जात आहे .


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १७ एप्रिल २०२५


## भाजपचा उन्मादपणा संपवायचा आहे, अंबादास दानवे यांचा हल्लाबोल



**नाशिक** : शिवसेना ठाकरे गटाचा नाशिक येथे निर्धार मेळावा होत असून राज्यातील सर्वच शिवसैनिकांनी येथे हजेरी लावली आहे. यावेळी अंबादास दानवे व चंद्रकांत खैरे एकत्र दिसून आले. यावेळी बोलताना अंबादास दानवे यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. भाजप उन्माद हत्तीसारखा वागत आहे, तो उन्मादपणा आपल्याला संपवायचा आहे, असे अंबादास दानवे म्हणाले आहेत.

अंबादास दानवे म्हणाले, शिवसेनेची ताकद आपल्यालाच माहित नाही, मुंबईत आपले आंदोलन दाबण्याचा प्रयत्न झाला. आंदोलन का दाबले जात आहे, जेंव्हा त्याचा भडका उडणार असतो. भाजप उन्माद हत्तीसारखे वागत आहे, आपल्याला हा उन्मादपणा खत्म केला पाहिजे, असे म्हणत अंबादास दानवे यांनी भाजपवर हल्लबोल केला. आता, लबाडांनो पाणी द्या! हे आंदोलन आम्ही उद्यापासून एक महिना संभाजीनगरमध्ये करणार आहोत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले, ८ जून रोजी मराठवाड्याचा शिबीर करणार आहोत, ८ जिल्ह्याचे मिळून हे शिवसेना पक्षाचे हे शिबीर असणार आहे. आपले कसे होणार? शिंदेंचे लोक काय करतात, भाजपचे लोक बघा कसे करत आहेत, हे आपले लोक म्हणत आहेत. सत्ता येईल आणि जाईल संघटनेचे काम त्यासाठी आपण करत नाहीत. आपल्याला पक्षाचा विचार रुजवायचा आहे, हे काम संघटनेचे आहे. पुढे बोलताना दानवे म्हणाले, राहुल गांधी यांना सुद्धा खुशवंत सिंह या पत्रकारने सांगितले की, तुम्हाला संघटनेचे काम कसे असते जाणून घ्यायचे असेल तर महाराष्ट्रमध्ये जा आणि शिवसेना पक्षप्रमुख यांचे काम बघा.

अंबादास दानवे म्हणाले, आपले ४०-५० आमदार जरी गेले असले तरी जाऊ द्या, मात्र संघर्ष करून आपण सत्तेत येऊ. काही काल बैठकीत सांगत होते २ वर्षांपूर्वी आलेला माणूस आम्हाला आदेश देतो, आम्ही पक्षात ४० वर्षांपासून काम करतोय. पण, आता ही पक्षाची सिस्टम आहे, ती समजून घेतली पाहिजे, असे म्हणत नाव न घेता चंद्रकांत खैरेंना टोलाही लगावला.

## कविते



दुःख आणि यातनांचा प्रवास सोपा नसतो कविते,
तू होती म्हणून
हे जगणं सहज सोपं नी सुंदर झालं
कविते,
तू येणार म्हंटले तरी मी सुखावून जातो कविते,
पण कधी कधी कित्येक दिवस
येतच नाही कविते
माझ्या शब्दांना अर्थच नाही
तुझ्याशिवाय,
ते फक्त कोरडे वांझ शब्द असतात
कोणताही काण्यार्थ नसलेले
कविते,
ही अनावर ओढ तू लावते
कित्येक दिवस
मी मात्र तुझ्यासाठी
वाटेवर लक्ष ठेवून असतो कविते
आता
वाटा आडवाटा नकोशा वाटतात
कारण तुझ्याशिवाय
माझ्या आयुष्याचं पान कोरे आहे कविते,
ही नुसतीच भावनांची नी
मोडक्या शब्द फुलांची अफाट गर्दी मला नकोच आहे कविते
तू मात्र माझ्या ओंजळीत
शब्दांचे अचूक दान टाकत आलीस कविते,
त्यामुळेच तुझ्या असंख्य अमर्याद शब्दफुलांनी
माझी काव्यबाग फुलून आली कविते,
तू असं काही दिलेस की
आयुष्याचं आयुष्यालाच माहित
मी आज जो काही आहे ते
तुझ्या मुळेच कविते
तू माझ्या जीवनात उजेड होवून आलीस
अन हा अवघा काळोख नाहिसा झालाय कविते,
तू
माझ्या भविष्याचं वर्तमान
आणि
वर्तमानाचं भविष्य ही आहे
कविते.....

✎ **डॉ. शिवाजी हुसे, कन्नड**
**मो. ९४०४० ००३९८**

## देवेंद्र फडणवीस सरकारने हनिमून पीरियडमध्ये काय केले ? आदित्य ठाकरेंचा सवाल



**नाशिक** : कोणताही नवीन मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिले शंभर दिवस किंवा तीन महिने हनिमून पीरियड असल्याचे म्हटले जाते. या काळामध्ये मुख्यमंत्री जे काही करतात त्यांच्या कामाचे कौतुक महाराष्ट्रातून होत असते. मात्र या हनिमून पीरियडमध्ये राज्यातील भाजप आणि 'महाझुटी' सरकारने काय केले? असा प्रश्न आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. त्यामुळे महाराष्ट्र चाललाय कुठे? याचा विचार करायचा असेल तर गेल्या शंभर दिवसात काय घडले, हे पहावे लागेल, असे देखील ते म्हणाले.

गेल्या शंभर दिवसात या सरकारने एकही चांगली योजना आणली नसल्याचा आरोप त्यांनी केला. ठाकरे गटाच्या वतीने नाशिकमध्ये आयोजित पदाधिकारी मेळाव्यात ते बोलत होते. या मेळाव्यात आदित्य ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस आणि महायुती वर निशाणा साधला. ते म्हणाले की, शेतकऱ्यांसाठी एकही चांगली योजना या सरकारने आणली नाही. महिलांसाठी एक तरी योजना आणली का? तरुणांसाठी तरी आणली का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तरुण वर्गासाठी, शिक्षण घेणाऱ्या किंवा नोकरी शोधणाऱ्या युवकांसाठी सरकारने एकही योजना आणली नसल्याची टीका आदित्य ठाकरे यांनी केली आहे.

लाडकी बहीण योजनेचे काय झाले? असा प्रति प्रश्न आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. या योजनेत ते आता पाचशे रुपयांवर आले आहेत. बहुमत ठासून आल्यानंतरही तुमच्या वचन नाम्यात असलेली एकही गोष्ट प्रत्यक्षात आणली जात नाही. यासाठी एक वेगळा निर्लज्जपणा लागत असल्याची टीका आदित्य ठाकरे यांनी महायुती सरकारवर केली आहे. अडीच कोटी महिलांना या योजनेचा लाभ मिळणार असल्याचा दावा केला जात होता. आता त्यात ५० कोटी महिला कमी करण्यात आल्या आहेत. आता त्यांचेच काही लोक कोर्टात जातील आणि कोर्टातून ही योजना बंद करतील, असा दावा देखील त्यांनी केला आहे.

भारतीय जनता पक्षाच्या आशीर्वादाने आणि निवडणूक आयोगाच्या आशीर्वादामुळे हे सरकार आपल्या डोक्यावर बसलेला आहे. त्यांना दुसरा कोणताही आशीर्वाद नसल्याचा दावा आदित्य ठाकरे यांनी केला आहे. या सरकारच्या पहिल्या शंभर दिवसांमध्येच राज्यात महिलांवर अत्याचार वाढले आहेत. या सरकारमध्ये संवेदनशीलता तर नाहीच मात्र, हे राक्षसी सरकार आपल्या डोक्यावर बसले आहे, अशा शब्दात आदित्य ठाकरे यांनी महायुती सरकारवर टीका केली.

बीड प्रकरणात प्रमुख आका अद्याप समोर आलेला नाही. बीड प्रकरणात संपूर्ण महाराष्ट्राला आका कोण हे माहिती आहे. मात्र तरी देखील तो अद्याप समोर आणला गेला नसल्याचे आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे. या प्रकरणात राजीनामा घ्या, आणि कारवाई करा, अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे आमदार देखील करत होते. मात्र, तरी देखील मुख्यमंत्र्यांचे हात का बांधले होते? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. या राज्यात भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या हत्या होत असेल आणि भाजपच्या पदाधिकाऱ्यांना न्याय मिळत नसेल तर इतरांनी करायचे काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

## काँग्रेस प्रदेशाध्यक्षांची मंगेशकर कुटुंबावर टीका

**मुंबई** : तनिषा भिसे मृत्यू प्रकरणात मंगेशकर कुटुंबाने बाळगलेले मौन अत्यंत अमानुष असल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. तनिषा भिसे यांना दीनानाथ रुग्णालयात तब्बल साडेपाच तास ताटळकत ठेवण्यात आले. त्यामुळे त्यांचा हकनाक बळी गेला. मातृत्वासाठी आसुसलेल्या महिलेचा अशा पद्धतीने बळी जाणे अत्यंत हृदयद्रावक आहे, असे ते म्हणालेत.

तनिषा भिसे नामक गरोदर महिलेला दीनानाथ रुग्णालयात गंभीर स्थितीत प्रसूतीसाठी आणण्यात आले होते. पण रुग्णालय प्रशासनाने त्यांना १० लाखांचे डिपॉझिट भरल्यानंतरच दाखल करून घेण्याची भूमिका घेतली होती. परिणामी, उपचारास विलंब झाल्यामुळे तनिषा यांचा मृत्यू झाला. हर्षवर्धन सपकाळ यांनी बुधवारी उपरोक्त शब्दांत आपला संताप व्यक्त केला.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, मंगेशकर कुटुंब हे महाराष्ट्र व भारताचे भूषण आहे. आतापर्यंतच्या सर्वच सरकारांनी त्यांचे हे योगदान मान्य केले आहे. दीनानाथ रुग्णालय बांधत असताना तत्कालीन सरकारने मंगेशकरांना मोठी मदत केली. पंडीत नेहरू यांनीही लता मंगेशकरांना ऐ मेरे वतन के लोगो गाणे म्हटल्याप्रकरणी सन्मानित केले होते. ही वस्तुस्थिती आहे. पण मी तनिषा भिसे कुटुंबीयांची भेट घेतली. तनिषा यांना तब्बल साडेपाच तास ताटकळत ठेवण्यात आले. त्यातून त्यांचा बळी गेला. मातृत्वासाठी आसुसलेल्या एखाद्या महिलेचा असा बळी जाणे अत्यंत हृदयद्रावक आहे.